पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ८०**
(सभावृत्तांत)

**दिनांक – ११/०९/२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ११/०९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.राजू मिसाळ
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.गीता सुशिल मंचरकर
१०. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
११. मा.लांडगे सारिका संतोष
१२. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४. मा.बारणे अर्चना तानाजी
१५. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे - सहाय्यक आयुक्त, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत, मा.दांगट – प्र. सहाय्यक आयुक्त,

मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.पाटील, मा.घुबे - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.चारटणकर – व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल, मा.माने – लेखाधिकारी, पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२४) यांत्रिक पध्दतीने (रोड स्वीपर मशीनद्वारे) रस्ते साफ सफाई कामासाठी सल्लागार नियुक्त करणेकामी मान्यता देणेबाबत.

विषय क्र.२५) तरतूद वर्ग करणेबाबत.

विषय क्र.२६) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व त्या अंतर्गत विविध ठिकाणी स्थापत्य विषयक व फर्निचरची कामे करणेबाबत.

----------

(चंद्रपूर येथे अदिवासी भागात राहणा-या दहा अदिवासी विद्यार्थ्यांनी मिशन एवरेस्ट यशस्वीपणे पुर्ण केले असल्यामुळे त्यांचा आणि सचिन दगडू कणसे याने २०१८-१९ मध्ये साऊथ आफ्रिका येथील किणी मांनास हे शिखर सर केले तसेच २०१७-१८ मध्ये युरोप येथील एलब्रुस शिखर सर केले बद्दल आणि श्री.जुंधारे कार्यकारी अभियंता यांची ऑफिसर ऑफ दि मन्थ म्हणून निवड झाली असल्यामुळे मा.सभापती, स्थायी समिती यांचे हस्ते सत्कार करण्यात आला)

----------

दिनांक ०५/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७९)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक -३१४१ विषय क्रमांक - ०१
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे जावक क्र.पअक/१/कावि/२३१/२०१८ दि.२९/०८/२०१८

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV22/1-2017-18 अन्वये मनपाच्या मैलाशुध्दीकरण केंद्रे व पंपीग स्टेशनमध्ये उर्जा निर्मितीकामी सोलर सिस्टीम बसविणेकामी मे.जी के एनर्जी मार्केटर्स प्रा.लि. यांचेकडुन नि.र.रु.७४,९९,५२५/- (अक्षरी र.रू.चौ-याहत्तर लाख नव्याण्णव हजार पाचशे पंचवीस फक्त) पेक्षा -११.५०% कमी या सुधारित दराने प्राप्त झालेली आहे. प्राप्त सुधारित दराने र.रु.६६,३७,०८०/- पर्यंत काम करुन घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१४२ विषय क्रमांक - ०२
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा. अति.आयुक्त(१) यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/३०८/२०१८ दि.२८/०८/२०१८

विषय – मनपाच्या भोसरी येथील अंकुशराव लांडगे प्रेक्षागृह इमारतीमधील अग्नीशमन यंत्रणेसाठी नविन रिंग मॅन पाईपलाईन टाकणे व अनुषंगिक कामे करणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१४३ विषय क्रमांक - ०३
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/१०१४३/२०१८ दि.०३/०९/२०१८

विषय - "फ क्षेत्रिय" कार्यालय स्थापत्य या विभागाकडील सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील कामांच्या अंतर्गत तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत.

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१४४ विषय क्रमांक - ०४
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – ब क्षेत्रीय, आरोग्य
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षेआ/५/कावि/५४६/२०१८ दि.०३/०९/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील स्वच्छ भारत मिशन (नागरी) व स्वच्छ महाराष्ट्र मिशन(नागरी) सन २०१८ अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१८ जनजागृती करणेकामी मे.आनंद एंटरप्रायझेस यांचा टि शर्ट (कॉटन), कॅप, महिलांसाठी एप्रन व ट्रॅक सुट इत्यादी साहित्या करीता एकूण र.रु.१,५९,१३५/- हा दर सर्व करासह इतर २ पुरवठाधारकांपेक्षा कमी दर असल्याने तो स्विकृत करणेस मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.०७/०७/२०१८ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.आनंद एंटरप्रायझेस यांचेकडून कोटेशन मंजूर दराने र.रू. १,५९,१३५/- (अक्षरी र.रू.एक लाख एकोणसाठ हजार एकशे पस्तीस फक्त) पर्यत काम करून घेण्यात आलेल्या करारनाम्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१४५ विषय क्रमांक - ०५
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/११/चिंचवड/६७६/२०१८ दि.०२/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या मंजूर विकास योजनेतीलमौजे चिंचवड येथील स नं ५१ पासुन पवना नदी लगतच्या स नं ४७ व ४८ पर्यंतच्या ४५ मी रस्त्याचे भूसंपादन करणेबाबत मा आमदार, चिंचवड मतदार संघ हे मागणी करीत आहेत. सदर रस्ता हा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील डांगे चौक ते निगडी गावांना जोडणारा महत्वाचा दुवा ठरणार आहे. त्यामुळे हिंजवडी आय टी पार्क ते तळवडे आय टी पार्क या ठिकाणी होणारी वाहतुक सुरळीत होणार आहे. मा.महापालिका सभा ठराव क्र.१७८, दि.२०/४/२०१८ नुसार मौजे चिंचवड येथील स नं ५१ पासुन पवना नदी लगतच्या स नं ४७ व ४८ पर्यंतच्या ४५ मी रस्त्याचे भूसंपादन करणेबाबत मा. महापालिका सभेची मान्यता मिळाली आहे. तथापि सदर भागातील नागरीक हे सदर ठिकाणच्या रस्ताबाधीत मिळकतींचा ताबा मनपास आवश्यक असेल तर सदर रस्त्याने बाधीत होणा-या मिळकतींची मोजणी ही मनपाने स्वत:चे खर्चाने करावी अशी मागणी करीत आहेत. सदर भागाचा आलेख मनपाकडे उपलब्ध नसल्याने रस्त्याची आखणी बसविणे,

जागावर सिमांकन करणे, विकास योजना अभिप्राय देणे या विभागास अशक्य होत आहे. नगरभूमापन कार्यालयाकडुन आलेख उपलब्ध झाल्यास बाधीत मिळकतींची आखणी भूमापन कार्यालयाकडुन उपलब्ध झाल्याने काम करणे सोईचे होईल. त्यानुसार बाधीत मिळकतधारक हे मनपास भूसंपादनाऐवजी टीडीआर किंवा खाजगी वाटाघाटीचे बदल्यात देखील बाधीत क्षेत्राचा आगाऊ ताबा देणेस तयार होतील. तरी उपरोक्त प्रस्तावित ४५ मी रस्त्याखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता व प्रस्तुत जमिनीचे भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी मा. महापालिका सभेची मान्यता घेणेत आलेली आहे. सदर रस्ता मनपाच्या ताब्यात भुसंपादनाने घेणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास (त्यामध्ये भूसंपादन विशेष अधिकारी कळवतील ती नुकसानभरपाई रक्कम) तसेच त्यासाठी आवश्यक ते सर्वेक्षण, मोजणी करणे इ.अनुषंगिक मंजूरीसह येणा-या सर्व खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१४६ — विषय क्रमांक - ०६

दिनांक – ११/०९/२०१८ — विभाग – वैद्यकिय मुख्य कार्यालय

सूचक – मा.अर्चना बारणे — अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/१७/कावि/५९०/२०१८ दि.०६/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कॉलेज आफ फिजीशीयन एँड सर्जन, मुंबई यांचेमार्फत घेण्यात येणारा सी.पी.एस. अभ्यासक्रम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये सन १९९८ पासुन सुरु करण्यात आलेला आहे. या अभ्यासक्रमाकरीता कॉलेज ऑफ फिजीशीयन एँड सर्जन, मुंबई यांचेमार्फत प्रवेश प्रक्रीया राबविणेत येत असुन त्यांचे मार्फतच उमेदवार/ विद्यार्थी यशवंराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये सी.पी.एस. अभ्यासक्रमाकरीता पाठविले जातात. तसेच सदर अभ्यासक्रमाकरीता मनपामार्फत विद्यार्थ्यांकडुन कोणतेही शुल्क आकारले जात नाही. कॉलेज ऑफ फिजीशीयन एँड सर्जन्स, मुंबई यांचे मार्फत सन २०१८ मधील प्रवेश प्रक्रीये बाबतचे प्रसिध्द केलेल्या माहिती पत्रकामध्ये सदर अभ्यासक्रमाकरीता पाठविल्या जाणा-या विद्यार्थ्यांकडुन र.रु. ४,५०,०००/- व संस्थेच्या कोट्या मधल्या विद्यर्थ्यांकडुन र.रु.९,००,०००/- इतके शुल्क आकारणी करणेबाबतची तरतुद नमुद केलेली आहे. त्यामुळे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामार्फत घेण्यात येत असलेल्या सदर अभ्यासक्रमासाठी येणा-या

विद्यार्थ्यांकडुन शुल्क आकारणी संदर्भात निर्णय घेणेसाठी मनपा स्तरावर मा. आयुक्त सो यांच्या आदेशान्वये मा. अति. आयुक्त १ यांच्या अध्यक्षतेखाली मुलेप, कायदा सल्लागार व आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीची सभा दि.३०-०८-२०१८ रोजी पार पाडली आहे. त्यामुळे समितीने सी.पी.एस. अभ्यासक्रमाकरीता विद्यार्थ्यांकडुन किती शुल्क आकारावे याबाबत अन्य संस्थांकडुन माहिती आलेली असता, त्यांचेकडुन प्रति विद्यार्थी ९ ते १० लाख रुपये इतके शुल्क आकारले जात असल्याची तोंडी माहिती देण्यात आलेली आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात सी.पी.एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मनपामार्फत देण्यात येणारे स्टायपेंड, सदर अभ्यासक्रमासाठी नेमण्यात आलेल्या Hon. Doctor (Teacher)यांना दिले जाणारे मानधन व सी.पी.एस. इन्सपेक्शन व रिन्युअल चार्जेस या सर्व बाबी मिळुन प्रत्येक विद्यार्थ्यामागे सरासरी दोन वर्षाचा खर्च र.रु. ७,८४,८००/- इतका येतो. सदरचा खर्च विचारात घेता, सी.पी.एस. विद्यार्थ्यांकडुन प्रत्येकी र.रु. ४.५० लाख प्रति वर्ष याप्रमाणे एकुण र.रु. ९ लाख (दोन वर्षासाठी) असे शुल्क आकारण्यास तसेच पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी यांच्याकडुन अभ्यासक्रमासाठी कुठलेही शुल्क न आकारता, र.रु.९ लाख रुपयांचा ५ वर्षांचा बाँण्ड लिहुन घेण्यास समितीने शिफारस / निर्णय दिलेला आहे. तरी, समितीच्या शिफारशीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएम रुग्णालयात सन २०१८-१९ व २०१९-२० या दोन वर्षासाठी सी.पी.एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांकडुन प्रत्येकी र.रु.४.५० लाख प्रतिवर्ष इतके शुल्क आकारणी करणेस तसेच पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी यांच्याकडुन अभ्यासक्रमासाठी कुठलेही शुल्क न आकारता, र.रु.९ लाख रुपयांचा ५ वर्षांचा बाँण्ड लिहुन घेण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१४७ विषय क्रमांक - ०७
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१२३/२०१८ दि.०५/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पाणीपुरवठा विभागाकडील ई-निविदा क्र.२/२/२०१८-१९ अन्वये जलशुद्धीकरण केंद्र से.२३ करीता ३६५ मे.टन द्रवरूप पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड खरेदीकामी वृत्तपत्र तसेच मनपा वेबसाईटवर निविदा नोटीस प्रसिद्ध करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा अटी व

शर्तीनुसार पात्र असलेल्या ०३ निविदा दि.२५/०६/२०१८ रोजी निविदा समितीपुढे उघडल्या असून दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| ठेकेदार | प्राप्त निविदा दर रू. |
|---|---|
| 1) मे.एस.व्ही.एस. केमिकल कॉर्पोरेशन | ३१,७००/-प्र.मे.टन (निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा १.७६% ने जादा) |
| 2) मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. | ३१,८९०/- प्र.मे.टन |
| 3) मे.जी एस. कमर्शिअल कॉर्पोरेशन | ३३,७५०/-प्र.मे.टन |

वरीलपैकी मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन यांची र.रू.३१,७००/- प्र.मे.टन दराची निविदा लघुत्तम निविदा आहे. जलशुद्धीकरणाचे प्रक्रियेमध्ये पावडर पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड हा घटक अत्यंत महत्वाचा असून त्याचा पुरवठा न चुकता अखंडीतपणे जलशुद्धीकरण केंद्रास होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा त्याचा शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होवू शकतो. यासाठी सदर पुरवठ्याकामी एकावेळी २ एजन्सीज मनपाचे हाताशी असने गरजेचे असलेने सदर निविदेतील शर्त क्र.५ नुसार सदरची खरेदी ६०:४० या प्रमाणात म्हणजेच 1st Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या ६०% व 2nd Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या ४०% परिमाण 1st Lowest ठेकेदाराच्या दराने खरेदी करावयाचे आहे. तरी, 1st Lowest ठेकेदार मे.एस. व्ही. एस. केमिकल कॉर्पोरेशन यांचेकडून एकूण परिमाणाच्या ६०% परिमाण म्हणजेच २१९ मे.टन पावडर पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड र.रु.३१,७००/- प्र.मे.टन दराने (एकूण खर्च र.रू.६९,४२,३००/-) दराने खरेदी करणेस मा.आयुक्त यांनी दि.०४/०९/२०१८ चे प्रस्तावान्वये मंजूरी दिलेली आहे. तरी मे.एस.व्ही.एस. केमिकल कॉर्पोरेशन यांचेकडून २१६ मे.टन पावडर पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड र.रू.३१,७००/- प्र.मे.टन (निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा १.७६% ने जादा) या दराने खरेदी करणेसाठी त्यांच्याशी करारनामा करणेस व याकामी येणारा एकूण खर्च र.रू.६९,४२,३००/- (अक्षरी र.रू.एकोणसत्तर लाख बेचाळीस हजार तीनशे फक्त) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१४८ विषय क्रमांक - ०८
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – क्रिडा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.आरती चोंधे, मा.मिनल यादव यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.०६ दि.०४/०९/२०१८ अन्वये मा.महिला बाल कल्याण समिती ठराव क्र.५ दिनांक – १७/०७/२०१८ मध्ये पुढील प्रमाणे दुरुस्ती करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळा कार्यालये व आवश्यक त्या ठिकाणी सॅनिटरी नॅपकीन माफक दरात पुरविणेसाठी व्हेडिंग मशीन बसविणे आवश्यक आहे. त्यासाठी एजी सेल्स,पुणे ३८ या कंपनीस वरील काम नियमानुसार देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१४९ विषय क्रमांक - ०९
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – क्रिडा
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.आरती चोंधे, मा.मिनल यादव यांचा प्रस्ताव विचारात घेवून –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.०७ दि.०४/०९/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सर्व प्रकारचे महिला बचत गटातील सर्व सभासदांना व पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टीत वास्तव्यास असलेल्या महिलांस त्यांचे आधारकार्ड घेऊन त्या आधारे रोज वापरासाठी शासन दर करारातील अनु.क्र.९ क प्रमाणे दोन चादर व अनु.क्र.८ ब प्रमाणे दोन बॅरेक कंबल व अनु.क्र.५ अ प्रमाणे दोन दरी पंजा व अनु.क्र.३ अ प्रमाणे दोन बेडशीट संच उपलब्ध करुन देणेकामी महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, दि पतंनगर गार्डन व्हयू को-ऑप हौसिंग सोसायटी लि. शशांक २२५/५९५८ पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई- ४०० ०७५ यांचेकडून शासनाच्या दर करारानुसार खरेदी करुन उपलब्ध करुन देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेस व सदरचा खर्च इतर योजना/कार्यक्रम या लेखाशिर्षातून करण्यास मान्यता देणेची मागणी असली तरी मा.महिला बालकल्याण समिती ठराव क्र.७ दि.४/९/२०१८ अन्वये महिला बाल कल्याण योजने अंतर्गत महिला बचत गटातील सर्व सभासदांना व पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टीत वास्तव्य असलेल्या महिलांना प्रस्तावात नमूद केले प्रमाणे लाभ देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्या ऐवजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील घोषीत अघोषीत झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास

असलेल्या सर्व महिलांना त्यांचे कुटुंबीयांच्या नावे असलेला फोटो पास अथवा स्वतःचे आधार कार्ड या पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य मानून त्या आधारे रोज वापरासाठी शासनदर करारातील अनु.क्र.९ क प्रमाणे २ चादर व अनु.क्र.८ ब प्रमाणे २ बॅरेक कंबल व अनु.क्र.५ अ प्रमाणे २ दरी पंजा व अनु.क्र.३ अ प्रमाणे २ बेडशीट संच हा प्रत्येक महिलेस वरिल प्रमाणे १ संच (२ चादर, २ बॅरेक कंबल व २ दरी पंजा व २ दरी बेडशीट) उपलब्ध करून देणेकामी महाराष्ट्र हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, पंतनगर गार्डन व्ह्यू को-ऑप हौसिंग सोसायटी लि. शशांक २२५/५९५८ पंतनगर, घाटकोपर (पुर्व) मुंबई – ४०० ०७५ यांचेकडून शासनाच्या दरकरारानुसार खरेदी करून उपलब्ध करून देणेस व त्याकामी सर्व खर्च नागरवस्ती व विकास योजना विभागाकडील २०१८-१९ या अंदाजपत्रकातील पान क्र.(३२२) क्र.(४) मधील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशिर्ष अनु. क्र.११ इतर योजना/ कार्यक्रम या उपलेखाशिर्षावरील तरतूदीमधून करण्यास तसेच त्याकामी लाभार्थींच्या संखेत वाढ झाल्यास ३१/३/२०१९ अखेर पर्यंतच्या कालावधीत सदर योजना राबविणेकामी आवश्यकते नुसार इतर लेखाशिर्षावरील अखर्चित/शिल्लक रकमेमधून रक्कम नागरवस्ती व विकास योजना विभागातील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशिर्ष अनु.क्र ११ इतर योजना/कार्यक्रम या लेखाशिर्षावर वेळोवेळी प्राधान्याने वर्ग करणेस अथवा सुधारित दाजपत्रकात याकामी आवश्यक तरतूद उपलब्ध करून देणेस मान्यता देणेत येत आहे. उपरोक्त संस्थेबरोबर करारनामा करणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१५० | विषय क्रमांक - १०

दिनांक – ११/०९/२०१८ | विभाग – क्रिडा

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.आरती चोंधे, मा.मिनल यादव यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.०८ दि.०४/०९/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाकडील बालवाडीच्या विद्यार्थी आणि विद्यार्थीनीसाठी खेळणी मध्यवर्ती भांडार विभागामार्फत निविदा सुचना क्रमांक २०१७/१८ अन्वये खरेदी करण्यात आली होती. सदर खेळणी घेतल्यामुळे मुलांच्या कार्यक्षमतेमध्ये व उपस्थितीमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. तरी सदर खेळणी मागील शैक्षणिक वर्ष संपत असताना मिळाली असल्याने ती खेळणी मागील वर्षी बालवाडीत असलेल्या विद्यार्थ्यांना काही काळासाठीच वापरता आली. त्यानुसार मागील बालवाडीतील विद्यार्थी यावर्षी पहिलीमध्ये असल्याने सदर खेळणी इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना वापरण्यात यावी. निविदेतील दराची ग्राहयता १ वर्ष असल्याने

बालवाडीसाठी त्याचदराने मागील मंजूर ठेकेदाराकडून खरेदी करण्यात यावी. तसेच शिक्षण विभाग यांनी दिनांक २१/०५/२०१८ च्या पत्राच्या मागणीनुसार १ ली ते ३ री विद्यार्थ्यांसाठी खेळण्यांची मागणी महिला व बाल कल्याण विभागाकडे केली असल्याने सदर खेळणी त्यांच्या पत्रानुसार मागील ठेकेदाराकडून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१५१ | विषय क्रमांक - ११
दिनांक – ११/०९/२०१८ | विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.सागर आंगोळकर | अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.अति.आयुक्त(२) यांचे जावक क्र.पअक/१/कावि/२३५/२०१८ दि.०५/०९/२०१८

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV/HO/21-2017-18 अन्वये पिंपरी चिंचवड शहरातील जैवविविधतेचा सर्व्हे करुन जैवविविधता नोंदणी रजिस्टर तयार करणे व स्थानिक जैवविविधता पॉलिसी व ॲक्शन प्लॅन तयार करणेसाठी प्रकल्प सल्लागार नेमणेकामी M/s.Terracon Ecotech Private Limited यांचेकडुन Part-A साठी र.रु.१०,००,०००/- व Part-B साठी र.रु.८,००,०००/-(एकुण र.रु १८,००,०००/-) या Lumsum व लघुत्तम दराने प्राप्त झालेली असून सदर दराने काम करुन घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१५२ | विषय क्रमांक - १२
दिनांक – ११/०९/२०१८ | विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.अर्चना बारणे | अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे जावक क्र.विमुका/४/कावि/२६९/२०१८ दि.०६/०९/२०१८

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालय अ प्रभागाकडील निविदा नो.क्र.८-६/२०१८/१९ मधील अ.क्र.३ अन्वये वार्ड क्र.४१ मधील गांधीनगर जवळील सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन येथे अग्निप्रितबंधक यंत्रणा बसविणेकामी मे. अग्निसुरक्षा इंजिनिअर्स नि.र.रू.२७,०८,५०१/- (अक्षरी र.रू.सत्तावीस लाख आठ हजार पाचशे एक फक्त) ४.००% कमी, या ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस

तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहुन ठेकेदाराबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१५३ विषय क्रमांक - १३
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग –यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ– मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३७०/२०१८ दि.०५/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुणालयाच्या विविध वॉर्डातील/विभागातील उपकरणांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक स्पेअर पार्टसची मागणी बायोमेडीकल इंजिनियर यांनी केलेली आहे. त्यानुसार आवश्यक स्पेअर पार्टसचा दिलेल्या मेकनुसार पुरवठा करणेसाठी ई-निविदा सुचना क्र.०५/२०१७-१८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त निविदांमध्ये मे.प्राईम सर्जिकल & फार्मा, चिंचवड यांचे ११ बाबींसाठी एकूण र.रु.६,९७,७६०/-, मे.अशोका डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक यांचे १ बाबीसाठी एकूण र.रु.५८,५००/- व मे.क्रिदय हेल्थ केअर, पुणे यांचे ६ बाबींसाठी एकूण र.रु.९१,०००/- चे दर लघुत्तम प्राप्त झाले असुन संबंधित दर स्विकृत करण्यात आलेले असुन संबंधित पुरवठा धारकांना करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने सदर स्पेअर पार्टस खरेदीसाठी होणारा खर्च एकूण र.रु.८,४७,२६०/- (अक्षरी र.रू. आठ लाख सत्तेचाळीस हजार दोनशे साठ फक्त) चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१५४ विषय क्रमांक - १४
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ– मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जावक क्र.मभां/०६/कावि/४१८/२०१८ दि.०६/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे विद्युत विभागासाठी विविध किरकोळ साहित्य खरेदीकामी ई निविदा सुचना क्र.57/2017-18 अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. निविदे अन्वये चार निविदाकार प्राप्त झाले. त्यानुसार प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.पायोनियर सेल्स यांचे बाब क्र.3 साहित्याचे लघुत्तम दर र.रू.4,94,850/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.8,25,000/- पेक्षा -40.01% ने कमी

असल्याने व मे धुपर ब्रदर्स ट्रेडींग प्रा.लि.यांचे बाब क्र.2 चे प्राप्त लघुत्तम दर र.रू.7,83,000/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.7,49,100/- दरापेक्षा 4.52% ने जास्त असल्याने तसेच मे.रूपलक्ष्मी इलेक्ट्रीकल्स यांचे बाब क्र.4 साहित्याचे प्राप्त लघुत्तम दर र.रू.24,750/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.25,000/- दरापेक्षा -1% ने कमी असल्याने याप्रमाणे सदर लघुत्तम एकुण बाब क्र.2,3 व 4 या साहित्याचे एकुण लघुत्तम दर र.रू.13,02,600/- हे एकुण अंदाजपत्रकीय दर र.रू.15,99,100/- (अक्षरी र.रू.पंधरा लाख नव्याण्णव हजार शंभर फक्त) पेक्षा -18.54% ने कमी असल्याने स्विकृत करण्यात आले व या लघुत्तम निविदाकारांकडून करारनामा करुन घेणेत आला असून त्यांना पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने प्रस्तूतकामी केलेल्या खर्चाची व संविदेची माहीती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१५५ विषय क्रमांक - १५

दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – स्थापत्य

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.कार्यकारी अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२०६/२०१८ दि.०७/०९/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.105/2/2017-18 अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील भोसरी विधानसभा कार्यक्षेत्रातील प्राथमिक सोय सुविधा (महापालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास) करणे. २)गट न.९६ स्वराज कॉलनी बोराडेवाडी मोशी येथे अंतर्गत सिमेंट रस्ते व गटारी करणेकामी मे. पांडुरंग एंटरप्रायजेस नि.र.रु.8,16,342/- (अक्षरी र.रु.आठ लाख सोळा हजार तीनशे बेचाळीस फक्त) पेक्षा 3.5०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.7,87,770/- पर्यंत काम करुन घेणेस, कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१५६ विषय क्रमांक - १६

दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – विद्युत,ज.शु.कें.से.२३

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/१/कावि/१७/२०१८ दि.०३/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

म.न.पा.च्या पिंपळे गुरव स.नं.७२ पंप हाऊस (ग्रा.क्र.१७०१४९०६६२८०) येथील उच्चदाब वीजभार (KVA Demand) वाढवून घेणेकामी म.रा.वि.वि.कं. यांस वीज पर्यवेक्षण व इतर शुल्क र.रुपये ३,८६,६९९/- (अक्षरी र.रु.तीन लाख शहाऐंशी हजार सहाशे नव्याण्णव फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१५७ विषय क्रमांक - १७

दिनांक – ११/०९/२०१८ विभाग –यशवंतराव च्वहाण स्मृती रूग्णालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ– मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३७८/२०१८ दि.०६/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुणालयाच्या विविध वॉर्डातील/ विभागातील उपकरणांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक स्पेअर पार्टसची मागणी बायोमेडीकल इंजिनियर यांनी केलेली आहे. त्यानुसार आवश्यक स्पेअर पार्टसचा दिलेल्या मेक नुसार पुरवठा करणेसाठी ई-निविदा सुचना क्र.०४/२०१७-१८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त निविदांमध्ये मे.आकाश मॆडिकेअर, सांगली यांचे ११ बाबींसाठी एकूण र.रु.१,९५,०५२/- मे.क्रिदय हेल्थ केअर, पुणे यांचे ६ बाबींसाठी एकूण र.रु.१,९०,७४६/- मे.साईसमर्थ मेडीकल & सर्जिकल, पुणे यांचे ८ बाबींसाठी एकूण र.रु.१,५९,०००/- व मे.पर्व, चिंचवड यांचे ५ बाबींसाठी एकूण र.रु.४,७६,४१८/- चे दर लघुत्तम प्राप्त झाले असुन संबंधित दर स्विकृत करण्यात आलेले असुन संबंधित पुरवठाधारकांना करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने सदर स्पेअर पार्टस खरेदीसाठी होणारा खर्च एकूण र.रु.१०,२१,२१६/- (अक्षरी र.रू. दहा लाख एकवीस हजार दोनशे सोळा फक्त) चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१५८ विषय क्रमांक - १८
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग –यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ– मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३७३/२०१८ दि.०६/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसिस विभागातील गॅंब्रो कंपनीचीडायलिसीस मशीन (Sr.No.६९९९) च्या दुरुस्तीकामी आवश्यक पार्टस खरेदीसाठी संबंधित कंपनी M/s.Baxter India Pvt. Ltd यांनी एकूण र.रु.५४,१२०/- चे दरपत्रक सादर केले असुन सदरचे दरपत्रक स्विकृत करण्यात आले आहे. त्यानुसार यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसिस विभागातील गॅंब्रो कंपनीची डायलिसीस मशीन (Sr.No.६९९९) च्या दुरुस्तीकामी आवश्यक पार्टस खरेदीसाठी संबंधित कंपनी M/s.Baxter India Pvt.Ltd यांचे अधिकृत स्पेअर पार्ट वितरक M/S.VEE AAR TECH SOLUTION, New Delhi यांचेकडून निविदा न मागवता, करारनामा न करता मनपा अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ (२) (२) नुसार थेट पध्दतीने खरेदी करण्यास व सदर खरेदीस होणारा खर्च र.रु.५४,१२०/- (अक्षरी र.रु.चोपन्न हजार एकशे वीस फक्त) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१५९ विषय क्रमांक - १९
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – नगररचना
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/१६/१३८३/२०१८ दि.०४/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील आकुर्डी डिस्ट्रीक सेंटर एच-१ ते एच-६ भूखंडामधील मोकळी जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेसाठी र.रु.१/- या नाममात्र दराचे भूखंडाचे अधिमुल्याच्या खर्चास तसेच भाडेपट्टा करार नोंदविण्याकामी अपेक्षित सर्व अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१६०

विषय क्रमांक - २०

दिनांक – ११/०९/२०१८

विभाग – लेखा

सूचक – मा.राजेंद्र गावडे

अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/१०४६५/२०१८ दि.०७/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

शहर अभियंता यांनी दि.१४/८/२०१८ चे प्रस्तावान्वये मा.महापालिका सभा ठराव क्र.२०१ दि.२२/६/२०१८ च्या उपसूचनेद्वारे नविन कामांचा समावेश करुन प्रशासकीय मान्यता घेवून र.रु.४,६८,००,०००/- वाढ/घट करणेबाबत प्रस्तावित केले आहे. मा.महापालिका सभा ठराव क्र.२०१ दि.२२/६/२०१८ च्या ठरावातील मंजूर उपसूचना सदस्य पारीत ठराव आहे. सदस्य पारीत ठरावावर कार्यवाही करणेचे अधिकार आयुक्त सो. यांचे आहेत. अंदाजपत्रकात नविन कामांचा समावेश करणेस, त्यातील अंदाजपत्रकीय रक्कमांना प्रशासकीय मान्यता देणे र.रु.४,६८,००,०००/- वाढ/घट करणेस मा.महापालिका सभेने मंजूरी दिलेली असली तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूची - ड मधील प्रकरण ७ तरतूद क्र.२ (१) नुसार अवलोकन करणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४,६८,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१६१

विषय क्रमांक - २१

दिनांक – ११/०९/२०१८

विभाग – लेखा

सूचक – मा.करूणा चिंचवडे

अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/१०४६२/२०१८ दि.२१/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

अति.आयुक्त, नागरवस्ती विकास योजना विभाग यांनी दि.९/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महापालिका हद्दीतील विधवा/घटस्फोटित महिलांना घरगुती व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे ही योजना राबविणेत येत आहे. त्याकामी विभागाअंतर्गत र.रु.१,५०,००,०००/- वर्गीकरण प्रस्तावीत केले आहे. मा.महिला बाल कल्याण समिती ठराव क्र.६ दि ६/६/२०१७ व मा.आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. नावियो/२/कावि/२२०/२०१८ दि.३१/८/१७ अन्वये सदर योजनेच्या अर्थ सहाय्यामध्ये वाढ करुन ती र.रु.१०,०००/- प्रति लाभार्थी करण्यात आली आहे. "उपलेखाशिर्ष" क्र.१४ मा.अटल बिहारी वाजपेयी-विधवा/घटस्फोटीत महिलांना अर्थसहाय्य" या उपलेखाशिर्षावर र.रु.१,५०,००,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी पन्नास लाख फक्त) इतकी तरतूद करण्यात आली असून आज अखेर सदर उपलेखाशिर्षावर र.रू.१,४५,००,०००/- (अक्षरी

र.रु.एक कोटी पंचेचाळीस लाख फक्त) इतका खर्च झाला आहे. पात्र होणारे अर्ज यांचा विचार करता सदर पात्र लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक असून त्याकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे अंदाजे र.रु.१,५०,००,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी पन्नास लाख फक्त) इतकी खर्चासाठी तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१,५०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१६२ विषय क्रमांक - २२

दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – ह क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.हक्षे/स्था/६७४/२०१८ दि.०७/०९/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्र.२० कासारवाडी येथे विद्याविकास शाळेजवळ सुलभ शौचालय बांधणेकामी (पैसे द्या व वापरा तत्वावर) मे.सुलभ इंटरनॅशनल या संस्थेकडून करारनामा करून निविदा न मागविता काम थेट पध्दतीने करणे व सदर शौचालयाअंतर्गत पुरूषांकरीता दहा संडास, सहा मुता-या व स्त्रियांकरिता सात संडास व केअर टेकर रूम बांधणेकामी येणा-या स्थापत्य व विद्युत यांच्या एकत्रित खर्चास अंदाजपत्रकीय र.रू.८३,१३,८६८/- व त्यावर कार्यवाहीभार शुल्क १५.००% या प्रमाणे करारनामा करून घेऊन काम थेट पध्दतीने देणे तसेच सदर कामासाठी वर्क ऑर्डर सोबत ३०% अँडव्हान्स, व प्लिंथ लेवल पर्यंत काम झालेनंतर दुसरा ३०% अँडव्हान्स, आर.सी.सी. व वीट बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ३०% रक्कम व उर्वरित १०% रक्कम काम पूर्ण झालेवर देणेत येणा-या प्रस्तावास व त्यासाठी येणा-या एकूण र.रू.९३,९४,६७१/- (अक्षरी र.रू.त्र्याण्णव लाख चौ-याण्णव हजार सहाशे एक्काहत्तर फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१६३ विषय क्रमांक - २३

दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – ह क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.हक्षे/स्था/६७५/२०१८ दि.०७/०९/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्र.२० कासारवाडी येथे जुन्या मुंबई पुणे हायवे जवळ सुलभ शौचालय बांधणेकामी (पैसे द्या व वापरा तत्वावर) मे.सुलभ इंटरनॅशनल या संस्थेकडून करारनामा करून निविदा न

मागविता काम थेट पध्दतीने करणे व सदर शौचालयाअंतर्गत पुरूषांकरीता दहा संडास, सहा मुता-या व स्त्रियांकरिता सात संडास व केअर टेकर रूम बांधणेकामी येणा-या स्थापत्य व विद्युत यांच्या एकत्रित खर्चास अंदाजपत्रकीय र.रू.५१,८५,५२५/- व त्यावर कार्यवाहीभार शुल्क १५.००% या प्रमाणे करारनामा करून घेऊन काम थेट पध्दतीने देणे तसेच सदर कामासाठी वर्क ऑर्डर सोबत ३०% अँडव्हान्स, व प्लिंथ लेवल पर्यंत काम झालेनंतर दुसरा ३०% अँडव्हान्स, आर.सी.सी. व वीट बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ३०% रक्कम व उर्वरित १०% रक्कम काम पूर्ण झालेवर देणेत येणा-या प्रस्तावास व त्यासाठी येणा-या एकूण र.रू.५९,६३,३५४/- (अक्षरी र.रू.एकोणसाठ लाख त्रेसष्ठ हजार तीनशे चौपन्न फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -३१६४ विषय क्रमांक - २४
दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/९/कावि/५७२/२०१८ दि.११/९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील मोठे रस्ते यांत्रिक पध्दतीने (रोडस्विपर वाहनाव्दारे) साफ सफाई कामाची निविदा नोटीस क्र.२/२०१५-१६ काढण्यात आली होती. सदर निविदेचा मुदतवाढ कालावधी दि.३१/०८/२०१८ रोजी संपुष्टात आलेला आहे. आरोग्य मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.०१/२०१८-१९ दिनांक २४/८/२०१८ अन्वये सदर कामाकरीता काढलेली सल्लागार नेमणूक करणेकामीची निविदा रद्द करणेत आलेली आहे. त्यामुळे यांत्रिक पध्दतीने (रोडस्विपर वाहनाव्दारे) रस्ते साफ सफाई कामाची निविदा प्रस्तावित करणेकामी पर्यावरण विभागाच्या सल्लागार पॅनल वरील यांत्रिक पध्दतीने (रोड स्विपरव्दारे) रस्ते साफ सफाई कामाचे निविदेचा अनुभव असलेले मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. या सल्लागार कंपनीची नियुक्ती करणेस मा. आयुक्तसो यांनी दि.२४/०८/२०१८ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. सदर निविदा प्रस्तावित करणेकामी शहरातील रस्ते व रुट चार्ट निश्चित करणे,त्याचा सर्व्हे करणे, RFP तयार व निविदा प्रक्रिया राबविणे इ. काम करणेकामी पर्यावरण विभागाच्या सल्लागार पॅनल वरील यांत्रिक पध्दतीने (रोड स्विपरव्दारे) रस्ते साफ सफाई कामाचे निविदेचा अनुभव असलेले मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. या सल्लागार कंपनीची नियुक्ती करणेस व येणा-या अंदाजे एकूण प्रकल्प खर्चापैकी भांडवली खर्चाचे (Capital cost) 0.70% अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे

कलम ७३ (क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१६५ विषय क्रमांक - २५

दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/१०३११/२०१८ दि.३१/८/२०१८ –

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

आरोग्य कार्यकारी अधिकारी आरोग्य मुख्य कार्यालय यांनी दि.२९/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये मा.क्षेत्रिय अधिकारी अ क्षेत्रिय कार्यालय यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक (१) अक्षेका/आ१/कावि/७०२/२०१८ दिनांक १८/८/२०१९ (२) अक्षेका/आ१/कावि/४०३/१८ दि.१८/८/२०१८ (३) अक्षेका/आ१/कावि/६०४/२०१८ दि.११/७/२०१८ अन्वये खाजगीकरणाद्वारे साफसफाई या लेखाशिर्षावर र.रु.१,७५,००,०००/- वाहन इंधन या लेखाशिर्षावर र.रु.३५,००,०००/- तसेच घरोघरचा कचरा गोळा करणे या कामासाठी र.रु.३५,००,०००/- इतकी तरतूद आरोग्य मुख्य कार्यालयाकडील घनकचरा व्यवस्थापन या लेखाशिर्षातून वर्ग करण्याची विनंती केली आहे. संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रातील कचरा वाहतुक खाजगीकरणाद्वारे करणेची निविदा कार्यवाही मुख्य कार्यालयामार्फत करणेत येणार होती. व सदरचा खर्च आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत होणार होता. तथापि सदरची निविदा कार्यवाही अद्याप प्रलंबित असलेने सदर नमूद लेखाशिर्षावरील तरतूद क्षेत्रिय कार्यालयात कमी पडत असलेने प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद र.रु.२,४५,००,०००/- (अक्षरी र.रू.दोन कोटी पंचेचाळीस लाख फक्त) वर्ग करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२,४५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३१६६ विषय क्रमांक - २६

दिनांक – ११/०९/२०१८ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/२-ब/४०८/२०१८ दि.११/९/२०१८ –

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.24/1/2018-19 अन्वये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व त्या अंतर्गत विविध ठिकाणी स्थापत्य विषयक व फर्निचरची कामे करणेकामी मे.सोपान जर्नादनराव घोडके नि.र.रू.3,87,62,189/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी सत्याऐंशी

लाख बासष्ठ हजार एकशे एकोणनव्वद फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.3,86,50,150/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.3,86,50,150/- पेक्षा 10.50% कमी म्हणजेच र.रु.3,45,91,884 /- + रॉयल्टी चार्जेस र.रु.28,339/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.83,700/- = एकुण र.रु.3,47,03,923 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/१०८६/२०१८
दिनांक -१२/०९/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.